नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १२८ Issue - 128 | वार - शनिवार दि. ३ ऑक्टोबर २०२६ Blow- Saturday Date 3 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## आशियाई स्पर्धेत भारताचे एकाच दिवसात ६ सुवर्णपदकांसह १० पदकांची कमाई

### आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात भारतीय महिला हॉकी संघाने जिंकलेले पहिलेच ऐतिहासिक सुवर्णपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जपानमधील ऐची-नागोया येथे सुरू असलेल्या २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी भारतीय थलीट्सनी ऐतिहासिक कामगिरी करत नवा इतिहास रचला आहे. भारताने एकाच मिनिटात तब्बल २ सुवर्णपदके जिंकण्याचा अनोखा पराक्रम केला असून संपूर्ण दिवसात भारताच्या खात्यात एकूण १० पदके जमा झाली आहेत.

या १० पदकांमध्ये तब्बल ६ सुवर्णपदके, २ रौप्यपदके आणि २ कांस्यपदकांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक कामगिरीसह भारताच्या एकूण पदकांची संख्या आता ७६ वर पोहोचली आहे. भारतीय महिला हॉकी संघाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत अंतिम सामन्यात बलाढ्य चीनचा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात भारतीय महिला हॉकी संघाने जिंकलेले हे पहिलेच ऐतिहासिक सुवर्णपदक ठरले आहे. दुसऱ्या बाजूला बॉक्सिंगमध्ये भारताच्या सुवर्णमुकुटात आणखी भर पडली. महिलांच्या ७५ किलो वजनी गटात लवलीना बोरगोहेन आणि ६५ किलो वजनी गटात परवीन हुड्डा यांनी सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तर पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात अंकुश पंघालने सुवर्ण पंच मारत इतिहास रचला.



### भारताने रचला इतिहास! महिला हॉकीत ४४ वर्षांची प्रतीक्षा संपवत जिंकले सुवर्णपदक

**जपानमधील काकामिगाहारा येथे पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या अत्यंत रोमहर्षक महिला हॉकी अंतिम सामन्यात भारताने चीनचा पराभव करत ऐतिहासिक सुवर्णपदक अपने नावा केले आहे. या विजयासह भारतीय महिला संघाने तब्बल ४४ वर्षांची मोठी प्रतीक्षा संपवली असून, १९८२ मधील सुवर्णपदकाच्या सुवर्णक्षणांची पुनरावृत्ती केली आहे. या अंतिम सामन्यात भारतासमोर गतविजेता आणि एफआयएच रँकिंगमध्ये उच्च स्थान असलेला बलाढ्य चीन संघ होता. सामन्याच्या सुरुवातीलाच वाहतूक कोंडीमुळे भारतीय संघ नियोजित वेळेच्या अवघ्या १५ मिनिटे आधी मैदानावर पोहोचला होता, ज्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते. मात्र, या सर्व अडथळ्यांवर मात करत भारतीय खेळाडूंनी मैदानात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.**

कुस्तीमध्ये पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात सुजीत कलकलने अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. तर तिरंदाजीत अंकिता भकत, कुमकुम मोहोद आणि कीर्ति शर्मा यांच्या महिला रिकर्व्ह संघाने सुवर्णपदक जिंकून भारताची मान अभिमानाने उंच केली. शनिवारी भारतीय पुरुष क्रिकेट संघाचा अंतिम सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध होणार असून, क्रिकेटमधूनही भारताला सुवर्णपदकाची मोठी आशा आहे.

अंकिता भकत, कुमकुम मोहोद, कीर्ति शर्मा : तिरंदाजी (महिला टीम रिकर्व्ह) - सुवर्णपदक

लवलीना बोरगोहेन : बॉक्सिंग (महिला ७५ किलो) - सुवर्णपदक

परवीन हुड्डा : बॉक्सिंग (महिला ६५ किलो) - सुवर्णपदक

अंकुश पंघाल : बॉक्सिंग (पुरुष ८० किलो) - सुवर्णपदक

सुजीत कलकल : कुस्ती (पुरुष ६५ किलो) - सुवर्णपदक

भारतीय महिला संघ : हॉकी - सुवर्णपदक

कुमकुम मोहोद, धीरज बोम्मदेवरा : तिरंदाजी (मिक्स्ड टीम रिकर्व्ह) - रौप्यपदक

धीरज बोम्मदेवरा, नीरज चौहान, यशदीप भोगे : तिरंदाजी (पुरुष टीम) - रौप्यपदक

नेत्रा कुमानन : सेलिंग (महिला डिंघी) - कांस्यपदक

भारतीय पुरुष संघ : सेपाकतकरा (क्वाड्रेट) - कांस्यपदक

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, ७ जणांचा मृत्यू

अमरावती : अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वेजवळ शुक्रवारी पहाटे समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच १८ जण जखमी झाले आहेत. वर्धा येथील सिंदी मेघे परिसरातील सार्वजनिक दुर्गा पूजा उत्सव समितीचे २५ ते ३० कार्यकर्ते टेम्पो-पिकअप वाहनाने शेगाववरून दुर्गा माता मूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतत होते. तेव्हा बोलेरो पिकअप वाहनाला मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, वाहनाचा चक्काचूर झाला. गाडीतील काही कार्यकर्ते थेट महामार्गाच्या बाजूला फेकले गेले. अपघातात ५ जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घनश्याम पाटील, प्रवीण बकाने, गोलू बादलगवार, ओम गावंडे, दत्ताजी खुरसागे, रोशन राऊत व मुनेश्वर ढोले अशी मृत व्यक्तींची नावं आहेत. मृतांमधील सर्वजण सोमनाथ लेआउट सिंधी मेघे येथील रहिवासी होते. अपघाताची माहिती मिळताच, स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले आहे. यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. वर्धा येथील सिंदी मेघे परिसरातील सार्वजनिक दुर्गा पूजा उत्सव समितीचे २५ ते ३० कार्यकर्ते शेगावला गेले होते. ही सर्व तरुण मंडळी २८ तारखेस शेगावला पोहचली होती. त्यानंतर शेगाववरून टेम्पो-पिकअप वाहनाने दुर्गा माता मूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतत होते. बोलेरो पिकअप वाहनाने ३० सप्टेंबर रोजी त्यांचा मूर्तीसह परतीचा प्रवास सूरू झाला. मूर्ती असल्याने वाहन अत्यंत संथ गतीने निघाले होते. अवघ्या ५ च्या स्पीड वाहन चालवत होते असं, रुग्णालयात उपचार घेत असलेले शिवम राऊत यांनी सांगितलं. मूर्ती गावाजवळ पोहचत असतानाच १२ चाकी अजस्त्र ट्रक या गाडीला वेगात येऊन धडकला. महामार्गाच्या अगदी एका बाजूला आमचे वाहन जात असताना आमची काहीच चूक नव्हती. मात्र ट्रक धडकला आणि होत्याचे नव्हते झाले, असे राऊत यांनी सांगितलं.



दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. तसेच जखमी रुग्णाची विचारपूस केली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलिसांकडून घटनेची सविस्तर चौकशी करण्यात येत आहे. या दुर्गा मंडळाचे हे आठवे वर्ष आहे. गेल्या पाच वर्षांपासून ही मंडळी समृद्धी मार्गानेच मूर्ती घेऊन येत असतात. मूर्तीसोबत असल्याने डोळ्यात तेल घालून व दक्ष राहून प्रवास केला जातो. यावेळी १४ फूट उंचीची दुर्गामाता मूर्ती सोबत होती. पण हा प्रवास जीवघेणा ठरला.



## लाठीचार्जमुळे गर्दी पांगवू शकता, पण आमचे प्रश्न थांबवू शकत नाही; ज्ञानेश कुमारांना राजीनामा द्यावाच लागेल, राहुल गांधींचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशभरात महात्मा गांधी यांची जयंती साजरी केली जात असतानाच, दुसरीकडे मतदारांची नावे वगळणे आणि व्होटर लिस्टमध्ये कथित गैरव्यवहाराच्या विरोधात युवक व विरोधी पक्ष रस्त्यावर उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि केंद्र सरकारवर गंभीर आरोप करत जोरदार हल्लाबोल केला आहे. युवक व्होट चोरीविरोधात शांततेच्या मार्गाने, घटनात्मक अधिकारांचा वापर करत आंदोलन करत आहेत, मात्र तरीही त्यांच्यावर लाठीचार्ज केला जात आहे, अशा शब्दात राहुल गांधी यांनी संताप व्यक्त केला.

राहुल गांधी म्हणाले की, आज गांधी जयंतीच्या दिवशी हजारो तरुण व्होट चोरीविरोधात रस्त्यावर उतरले आहेत. हे लोक कोणत्याही हिंसेशिवाय अत्यंत शांततेत आंदोलन करत आहेत. त्यांची मागणी स्पष्ट आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, लोकशाही वाचवावी. पण यावर मोदी-शाह सरकारचे उत्तर काय? तरुण मुला-मुलींना रस्त्यावर ओढले जात आहे, शेकडो तरुणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचा गुन्हा फक्त एवढाच आहे की त्यांनी व्होट चोरीवर प्रश्न विचारला.

राहुल गांधींनी पुढे म्हटले की, बापूंनी आपल्याला हेच शिकवले आहे की सत्याच्या आणि अहिंसेच्या मार्गाने लढा, आणि याच गोष्टीला हे सरकार सर्वात जास्त घाबरते. कारण काठीने गर्दी रोखता येईल, लोकांचे प्रश्न नाही. ज्ञानेश कुमार यांना जावेच लागेल आणि ज्या सिस्टीमने त्यांना तिथे बसवले आहे, ती सिस्टीमसुद्धा जाईल.

स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन प्रक्रिया आणि मतदार यादीतील कथित घोळाविरोधात गांधी जयंतीच्या दिवशी देशभरात विरोधी पक्ष आणि विद्यार्थी संघटनांनी आंदोलन पुकारले. दिल्लीतील जंतर-मंतरकडे मोर्चा काढणाऱ्या विविध विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी बॅरिकेड्स लावून रोखले आणि शेकडो आंदोलकांना ताब्यात घेतले. दुसऱ्या बाजूला, मुंबईतील शिवाजी पार्क येथे 'कॉकरोच जनता पार्टी' आणि इतर संघटनांचे आंदोलन पार पडले. निवडणूक आयोग निष्पक्षपणे काम करण्याऐवजी सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली काम करत असून पात्र मतदारांची नावे यादीतून हटवली जात आहेत, असा गंभीर आरोप आंदोलकांनी केला आहे.

## ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत सीजेपीचे 'जेल भरो' आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईत २ ऑक्टोबरला आज कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन सुरू आहे. हे आंदोलन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनामाच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. मतदार यादीच्या एसआयआर प्रकीरियेवर आक्षेप घेत उगझने निवडणूक आयोगाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले आहे. आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारल्यांनंतर कॉक्रोच जनता पार्टीने ' जेल भरो आंदोलन ' करण्याची भूमिका घेतली. निवडणूक आयोगात तीन आयुक्त आहेत, त्यात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आहेत. गेल्या १० महिन्यात १४ वेळा निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी आक्षेप घेतला होता. हे आक्षेप विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेशी संबंधित निर्णय आणि आदेशांवर नोंदवले. त्यांनतर निवडणूक आयुक्तांनी मत मतांतरे असू शकतात मात्र अंतिम निर्णय एकमताने घेण्यात आल्याचे सांगितले.

### पंतप्रधानांनी त्यांच्या धैर्याचे कौतुक करत संपूर्ण देश त्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करत असल्याचे सांगितले

## विमानातील हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींनी कॅप्टन स्मित माच्छर यांच्याशी साधला संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : फ्लायदुबईच्या विमानात कॉकपिटमध्ये झालेल्या हल्ल्यात जखमी झालेले भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छर यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. यावेळी पंतप्रधानांनी संकटाच्या प्रसंगी दाखवलेल्या धैर्याबद्दल मच्छर यांचे कौतुक केले आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या फ्लायदुबईच्या विमानात काही दिवसांपूर्वी हा प्रकार घडला. विमान हवेत असताना सहवैमानिकाने कॅप्टन मच्छर यांच्यावर चाकूने हल्ला केल्याची माहिती आहे. या हल्ल्यात मच्छर गंभीर जखमी झाले. मात्र, जखमी अवस्थेतही त्यांनी परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला.



विमानावर नियंत्रण ठेवण्यासाठी कॉकपिटमध्ये पोहोचणे गरजेचे असल्याचे लक्षात आल्यानंतर मच्छर यांनी प्रयत्न करून कॉकपिटचा दरवाजा उघडला. त्यानंतर विमानातील प्रवासी आणि क्रू सदस्यांनी हल्लेखोराला नियंत्रणात आणल्याचे सांगण्यात आले. पुढे विमानाचे सौदी अरेबियातील तबूक येथे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

पंतप्रधान मोदींसोबतच्या संवादादरम्यान मच्छर भावूक झाले. या प्रसंगात त्यांना मानसिक आधार देणाऱ्या गोष्टींबाबत बोलताना त्यांनी संकटाच्या वेळी हनुमान चालिसेचे पठण केल्याचे सांगितले. पंतप्रधानांनी त्यांच्या धैर्याचे कौतुक करत देशातील नागरिक त्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करत असल्याचे सांगितले.

मच्छर यांनी या घटनेतील थरारक प्रसंगही पंतप्रधानांना सांगितला. गंभीर दुखापत झाल्यानंतरही विमान खाली जात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी कॉकपिटपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नामुळे पुढील परिस्थिती नियंत्रणात आणण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

घटनेनंतर कॅप्टन मच्छर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, विमानातील हल्ल्याच्या घटनेची संबंधित यंत्रणांकडून चौकशी सुरू आहे. हल्ल्यामागील नेमके कारण आणि घटनेतील इतर बाबी तपासल्यानंतर स्पष्ट होणार आहेत.

## 'एमपीएससी'च्या सचिवांची अखेर बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आश्वासन पाळत एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीचा निर्णय घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून शुक्रवारी यासंदर्भातील आदेश काढण्यात आले आहेत.

एमपीएससीच्या विविध परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने ३० सप्टेंबरला मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. त्यावेळी हरपाळकर यांची तत्काळ बदली करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानंतर शासनाने त्यानुसार कार्यवाही केली आहे. औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणानंतर एमपीएससीच्या कारभाराबाबत विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची तसेच आयोगाच्या कारभारात सुधारणा करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली होती. पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगरसह विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. दरम्यान, सप्टेंबरमध्ये नवी मुंबईत संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना घडली होती. या प्रकाराचा विविध विद्यार्थी संघटनांनी निषेध केला होता. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करणे आणि त्यासाठी लोकशाही मार्गाचा अवलंब करणे आवश्यक असल्याची भूमिका काही विद्यार्थी संघटनांनी घेतली होती.

### आयोगाच्या कारभाराची न्यायालयीन चौकशी

मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एमपीएससीच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या कार्यकाळातील कारभाराची तीन महिन्यांत न्यायालयीन चौकशी करण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. तसेच परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेणे, परीक्षापद्धतीत सुधारणा करणे आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविणे यासंदर्भातही निर्णय जाहीर करण्यात आले आहेत.

## संपादकीय....

### आश्वासनपूर्ती

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आश्वासन पाळत एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीचा निर्णय घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून शुक्रवारी यासंदर्भातील आदेश काढण्यात आले आहेत. एमपीएससीच्या विविध परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने ३० सप्टेंबरला मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. त्यावेळी हरपाळकर यांची तत्काळ बदली करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानंतर शासनाने त्यानुसार कार्यवाही केली आहे. औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणानंतर एमपीएससीच्या कारभाराबाबत विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची तसेच आयोगाच्या कारभारात सुधारणा करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली होती. पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगरसह विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. दरम्यान, सप्टेंबरमध्ये नवी मुंबईत संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना घडली होती. या प्रकाराचा विविध विद्यार्थी संघटनांनी निषेध केला होता. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करणे आणि त्यासाठी लोकशाही मार्गाचा अवलंब करणे आवश्यक असल्याची भूमिका काही विद्यार्थी संघटनांनी घेतली होती. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एमपीएससीच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या कार्यकाळातील कारभाराची तीन महिन्यांत न्यायालयीन चौकशी करण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. तसेच परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेणे, परीक्षा-पद्धतीत सुधारणा करणे आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविणे यासंदर्भातही निर्णय जाहीर करण्यात आले आहेत.

# नरहर शेषराव पोहनेरकर: मराठवाड्याचा चालताबोलता इतिहास

**(३–९ ऑक्टोबर:नरहर शेषराव पोहनेरकर जयंती सप्ताह.)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नरहर शेषराव पोहनेरकर हे मराठी साहित्यातील एक बहुआयामी लेखक, कवी, निबंधकार आणि संशोधक होते. त्यांनी मराठी साहित्यात वैविध्यपूर्ण लिखाण करून मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्याबद्दलची महत्त्वाची माहिती: नरहर शेषराव पोहनेरकर यांनी साहित्यातील अनेक प्रकार हाताळले, ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो: १ विविध साहित्यप्रकार: त्यांनी निबंध, लघुकथा, कादंबरी आणि कविता या क्षेत्रांत विपुल लेखन केले. १ संशोधन कार्य: ते प्रामुख्याने जुन्या आणि अप्रकाशित मराठी काव्यग्रंथांचे तसेच वाङ्मयेतिहासाचे अभ्यासक व संशोधक म्हणून ओळखले जात. मराठवाडा आणि आसपासच्या भागा–तील मराठी साहित्याच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान मानले जाते. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजी सदर मार्गदर्शक संकलित लेख प्रस्तुत करताहेत जी..... संपादक.

नरहर शेषराव पोहनेरकर– दादासाहेब पोहनेरकर हे महाराष्ट्राच्या इतिहास आणि साहित्यविश्वातील एक अत्यंत महत्त्वाचे इतिहासकार, लेखक, संशोधक आणि संतसाहित्याचे अभ्यासक होते. मराठवाड्याच्या इतिहासाचा, संस्कृतीचा आणि तिथल्या साहित्याचा त्यांनी अत्यंत सखोल अभ्यास केला होता, ज्यामुळे त्यांना मराठवाड्याचा चालताबोलता इतिहास म्हणून ओळखले जायचे. त्यांच्या जीवनचरित्राची महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

जन्म आणि मृत्यू–

जन्म: दि.३ ऑक्टोबर १९०७

मृत्यू: दि.२ सप्टेंबर १९९०

जीवन प्रवास: त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य इतिहास संशोधन, साहित्य सेवा आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी समर्पित केले होते.

हित्यिक आणि संशोधनात्मक कार्य: पोहनेरकर यांनी मराठी साहित्यातील विविध प्रकारांमध्ये दर्जेदार लेखन केले. त्यांच्या प्रतिभेचा परीघ विस्तृत होता: (१) विविध साहित्यप्रकार: त्यांनी निबंध, लघुकथा, कादंबरी आणि कविता यांसारख्या अनेक साहित्यप्रकारांमध्ये आ–पले योगदान दिले. (२) मराठवाडा इतिहास संशोधन: त्यांनी तत्कालीन निजामशाहीच्या काळातील आणि त्यापूर्वीच्या मराठवाड्याच्या ऐतिहासिक दस्तऐवजांचे, शिलालेखांचे आणि पाऊलखुणांचे मोलाचे संशोधन केले. (३) संतसाहित्य अभ्यास: महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा आणि त्यांच्या साहित्याचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. (४) संघर्षमय जीवन: त्यांनी आपल्या आयुष्यात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना केला. एका प्रसिद्ध संदर्भानुसार, त्यांनी पिठाची गिरणी चालवून मिठाची– पोटाची व्यवस्था करत आपली साहित्याची आणि इतिहासाची सेवा अविरतपणे चालू ठेवली होती.

वैशिष्ट्य आणि वारसा: त्याकाळी मराठवाडा हा निजामी राजवटीच्या प्रभावाखाली असल्याने तिथला इतिहास आणि मराठी संस्कृती मुख्य प्रवाहापासून काहीशी बाजूला पडली होती. अशा काळात नरहर शेषराव पोहनेरकर यांनी मराठवाड्याचा वैभवशाली इतिहास पुराव्यांसह जगासमोर आणण्याचे मोलाचे कार्य केले. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! नरहर शेषराव पोहनेरकर यांना व त्यांच्या साहित्यिक कार्यांना पावन जयंती पर्वावर सप्ताहभर विनम्र अभिवादन जी !!

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(दिनविशेषकार)**
**. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**

# माळसावरगाव शिवारात दुष्काळी पंचनाम्याला सुरुवात; साहेब, सांगा आता शेतकऱ्यांनी जगायचं कसं? - अयाज खान यांचा प्रशासनासमोर सवाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केल्यानंतर सिंद–खेड राजा तालुक्यातील माळस–ावरगाव शिवारात आज दुष्काळी नुकसानीच्या पंचनाम्याला सुरुवात झाली. गट नंबर १२६, शिवार माळसावरगाव, तालुका सिंदखेडराजा, जिल्हा बुलढाणा येथे शेतकरी नेते अयाज खान यांच्या शेताची मा. उपविभागीय अधिकारी श्री. खडसे साहेब आणि तहसीलदार श्री. अजयजी दिवटे साहेब यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली.

यावेळी कपाशी आणि सोयाबीनची अत्यंत गंभीर अवस्था अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली. सोयाबीनची झाडे उभी असली तरी शेंगा लागलेल्या दिसत आ–हेत; मात्र शेंगांमध्ये दाणेच भरलेले नाहीत. अयाज खान यांनी स्वतः सोयाबीनच्या शेंगा अधिकाऱ्यांच्या हातात देत,

साहेब, स्वतः बघा शेंगा आहेत, पण दाणेच नाहीत. आता सांगा, शेतकऱ्यांनी जगायचं कसं?

असा काळजाला भिडणारा सवाल केला आणि कपाशीच्या शेतात पाहणी केली असता अपेक्षित बोंडधारणा झालेली नसून पाते दिसत आहेत पण पाऊस नसल्यामुळे व वाढते तापमान कायम राहिल्यास ही पातेही काही दिवसांत गळून पडण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

अयाज खान यांनी प्रशास–नासमोर शेतकऱ्यांची व्यथा मांडताना सवाल केला,

साहेब, अशी शेती करून जगायचं कसं? शेती करायची की जमीन पडीत ठेवायची? सांगा साहेब, शेतकऱ्यांनी जगायचं कसं देवी त्यांचे डोळे भरून आले आणि हात जोडून विनंती केली फक्त भरीव मदत द्या संपूर्ण तालुक्याला ?

अयाज खान हे यापूर्वीही शेतकरी योद्धा कृती समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरील विविध आंदोलनांमध्ये सहभागी झाले आहेत. पीक विम्याच्या प्रश्नासाठीही त्यांनी शासनाचे दरवाजे ठोठावून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आवाज उठवला आहे.

आजच्या पाहणीदरम्यान त्यांनी पुन्हा एकदा प्रशास–नाला शेतकऱ्यांच्या वास्तविक परिस्थितीची जाणीव करून देत दुष्काळामुळे झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीची योग्य नोंद पंचनाम्यात करावी आणि शेतकऱ्यांना १०० टक्के नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी केली.

शेतात पीक उभं दिसतंय म्हणून नुकसान नाही, असं समजू नका; शेंगा उघडून पाहा, त्यामध्ये दाणा आहे का ते तपासा. कपाशीची बोंडधारणा किती आहे ते प्रत्यक्ष पाहा आणि मग शेतकऱ्याचं नुकसान ठरवा, अशी भूमिका अयाज खान यांनी मांडली.

साहेब, सांगा आता शेतकऱ्यांनी जगायचं कसं ?

हा सवाल आज गट नंबर १२६, माळसावरगाव शिवारातून प्रशासनासमोर पुन्हा एकदा उप–स्थित झाला.

# दिंडोरी तालुका काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी विकास धात्रक यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दिंडोरी तालुका काँग्रेस कमिटी कार्याध्यक्षपदी उमराळे येथील सामाजिक कार्यकर्ते आणि युवक नेते विकास शिवाजी धात्रक यांची नियुक्ती करण्यात आली आहे अशी माहिती दिंडोरी तालुका काँग्रेस तालुकाध्यक्ष डॉ. नारायण पाटील यांनी दिली.

नाशिक येथील काँग्रेस कमिटी कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष रमेश कहांडोळे, ज्येष्ठ नेते डॉ. पुंडलिक धात्रक, नाशिक शहराध्यक्ष निलेश खैरे, काँग्रेस वैद्यकीय मदत कक्ष प्रदेश अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर गायकवाड, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयेश पोकळे, जिल्हा कोषाध्यक्ष धर्मराज जोपळे, आदी मान्यवर उपस्थित होते. पक्षाची भूमिका आणि वरिष्ठ नेतृत्व यांच्या मार्गदर्शनाखाली आपण दिंडोरीत काँग्रेस पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी कटिबद्ध राहू अशी प्रतिक्रिया विकास धात्रक यांनी दिली.

कार्याध्यक्ष पदी नियुक्ती बद्दल धात्रक यांचे तालुकाध्यक्ष डॉ .नारायण पाटील, प्रभाकर धात्रक, गौरव पानगव्हाने,शिवाजी पता–डे, प्रकाश जाधव,तुळशीराम पाटील,साहेबराव चारोस्कर,महेंद्र गवारे,प्रल्हाद मिस्त्री, शंकर निंबेकर,श्री नारायण सोनवणे, राहुल भोये, गोरख बोंबले, सिताराम टोंगारे, हेमंत नाठे, दिगंबर सोनवणे, कृष्णा जाधव, अजिंक्य अपसुंदे, भगवान डंबाळे,माणिक बोंबले, आकाश गरड,आदि मान्यवर, कार्यकर्ते व हितचिंतक यांनी अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्रात कॅबप्रमाणेच आता एका क्लिकवर मिळणार रुग्णवाहिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णवाहिका मिळवणे आता कॅब बुक करण्याइतके सोपे होणार आहे. राज्य परिवहन आणि आरोग्य विभागाकडून एका नाविन्यपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्मवर काम सुरू असून, याद्वारे नागरिक मोबाईल प किंवा वेबसाइटच्या माध्यमातून आपल्या सर्वात जवळ उपलब्ध असलेली रुग्णवाहिका सहज शोधू आणि बुक करू शकतील.

प्रणालीची प्रमुख वैशिष्ट्ये:

थेट स्थान आणि माहिती: या प्रस्तावित प्लॅटफॉर्मवर रुग्णवाहिकेचे लाईव्ह लोकेशन (थेट स्थान), पोहोचण्याची अंदाजित वेळ (एढ) आणि प्रवासाचे सेवा शुल्क स्पष्टपणे दाखवले जाईल.

आरोग्य आणि परिवहन विभागाचा संयुक्त उपक्रम: विविध प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये नोंदणीकृत असणाऱ्या सर्व रुग्णवाहिकांचे तपशील या प्रणा–लीशी जोडले जातील.

खाजगी चालकांचा सहभाग: खाजगी रुग्णवाहिका चालक आणि रुग्णालयांनाही या डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचे नियोजन असून, त्यांच्यासाठी किमान वैद्यकीय सुविधा आणि मानके बंधनकारक केली जाऊ शकतात.

# डॉ. अनिकेत देशमुख : संस्थात्मक संघटन, उत्कृष्ट नेतृत्व, सामाजिक बांधिलकी आणि सर्वांगीण विकासाचे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला तालुका आणि परिसराच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक विकासामध्ये डॉ. अनिकेत देशमुख यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. सेवाभावी वृत्ती, सामाजिक बांधिलकी, उत्कृष्ट संस्थात्मक संघटन कौशल्य, दूरदृष्टी, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची वृत्ती आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या संधी पोहोचविण्याची तळमळ ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

डॉ. अनिकेत देशमुख यांचे नेतृत्व हे केवळ एखाद्या संस्था किंवा एका क्षेत्रापुरते मर्यादित नाही. शिक्षण, आरोग्य, रोजगार, विद्यार्थी विकास, सामाजिक सेवा, सांस्कृतिक जतन आणि ग्रामीण विकास या विविध क्षेत्रांना त्यांनी आपल्या कार्याशी जोडले आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व हे खऱ्या अर्थाने बहुआयामी आणि सर्वगुणसंपन्न नेतृत्वाचे उदाहरण ठरते.

संस्थात्मक संघटन आणि उत्कृष्ट नेतृत्व याची आता समाजाला फार मोठ्या प्रमाणात गरज भासत आहे.

मोठ्या प्रमाणावर सामाजिक व शैक्षणिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी केवळ आर्थिक साधने पुरेशी नसतात; त्यासाठी योग्य नियोजन, सक्षम कार्यसंघ, समन्वय आणि नेतृत्व आवश्यक असते. डॉ. अनिकेत देशमुख यांची हीच संघटनात्मक क्षमता त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येते.

विविध क्षेत्रांतील व्यक्ती, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ आणि स्वयंसेवक यांना एका ध्येयासाठी एकत्र आणण्याचे कौशल्य त्यांच्या नेतृत्वात आहे. 'एकट्याने पुढे जाण्यापेक्षा सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणे' हा त्यांच्या कार्यशैलीचा मूलमंत्र म्हणावा लागेल.

सामाजिक बांधिलकी जप–ताना डॉ. अनिकेत देशमुख यांनी आरोग्य क्षेत्राला विशेष महत्त्व दिले आहे. सांगोला शहराबरोबरच सांगोला तालुक्यातील खेडोपाडी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या गरजू नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे कार्य करण्यात आले.

विशेषतः श्रमिक दिनाच्या निमित्ताने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरामध्ये ६०० पेक्षा अधिक गरजू रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना आरोग्यसेवा देण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना शहरातील महागडी आरोग्यसेवा घेणे अनेकदा आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही. ही अडचण लक्षात घेऊन आरोग्यसेवा त्यांच्या दारापर्यंत नेण्याचा प्रयत्न त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवितो.

आरोग्य तपासणीपुरतेच हे कार्य मर्यादित न राहता नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागृती, वेळेवर तप–ासणी आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व निर्माण करण्यासाठीही अशा उपक्रमांचा उपयोग झाला आहे. एवढेच नव्हे तर गरजू रुग्णांसाठी आरोग्यसेवेचा संवेदनशील उपक्रम राबविणे व महाविद्यालयाच्या माध्यमातून पॅरामेडिकल कोर्सेस ची सुरुवात करण्याचा मानस हा त्यांच्या दृष्टीचा एक भाग आहे.

आरोग्य क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे रक्तदान शिबिरांचे आयोजन. रक्ताची गरज ही कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही वेळी निर्माण होऊ शकते. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया करणारे रुग्ण, प्रसूतीदरम्यान रक्ताची आवश्यकता असणाऱ्या महिला तसेच विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी रक्ताचा साठा उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

ही सामाजिक गरज लक्षात घेऊन सांगोला शहराबरोबरच खेडोपाडी रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागातील युवक, विद्यार्थी, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांना रक्तदानासाठी प्रेरित करून सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात आली.

रक्तदान म्हणजे केवळ रक्त देणे नव्हे, तर एखाद्याचे जीवन वाचविण्याची संधी देणे होय, या भावनेतून रक्तदान चळवळीला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला. खेड्यापाड्यांमध्ये रक्तदान शिबिरे घेऊन रक्तदानाची संस्कृती ग्रामीण समाजामध्ये रुजविणे हे त्यांच्या कार्यातील विशेष योगदान म्हणावे लागेल.

डॉ. अनिकेत देशमुख यांच्या कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान मिळवून पदवी प्राप्त करणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संवादकौशल्य, सर्जनशीलता, सामाजिक जाणीव आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित होणे आवश्यक आहे, या विचारातून विविध विद्यार्थी–केंद्रित उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, ग्रामीण भागा–तील विद्यार्थ्यांनाही आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळावी आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी वक्तृत्व स्पर्धा, लोकनृत्य स्पर्धा आणि विविध सांस्कृतिक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्याव्यक्तिमत्त्वविकासाला प्राधान्य देणे हा त्यांचा स्वभाव गुण असल्यामुळे अगदी जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यापासून वरिष्ठ महाविद्यालयापर्यंत सर्वांना समान संधी देण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयाच्या व उपमाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबवलेली आहेत.

या उपक्रमाचे सर्वांत उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे त्याची व्यापकता आणि सर्वसमावेशकता. स्पर्धा केवळ एखाद्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपुरती किंवा शहरातील विद्यार्थ्यांपुरती मर्यादित न ठेवता तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांपासून ते जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयांपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही शहरातील विद्यार्थ्यांइतकीच गुणवत्ता आणि प्रतिभा असते; मात्र योग्य व्यासपीठाचा अभाव असल्यामुळे त्यांची प्रतिभा अनेकदा समाजासमोर येत नाही. ही बाब लक्षात घेऊन विविध शैक्षणिक स्तरांवरील विद्यार्थ्यांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.

वक्तृत्व स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली, तर लोकनृत्य स्पर्धांमधून ग्रामीण संस्कृती, लोककला आणि परंपरांचे जतन व संवर्धन करण्याला प्रोत्साहन मिळाले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना, नेतृत्वगुण आणि सादरीकरण कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.

शिक्षण आणि रोजगार यांचा जवळचा संबंध आहे हे त्यांनी चांगले जाणलेले असल्यामुळे ग्रामीण भागा–तील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळाले तरी त्यांना रोजगाराच्या संधी, योग्य मार्गदर्शन आणि कौशल्यविकासाची आवश्यकता असते. ही गरज लक्षात घेऊन खेडोपाड्यातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम आणि रोजगाराभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर न बनविता त्यांना रोजगारक्षम, कौशल्यसंपन्न, आत्मविश्वासू आणि आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न या कार्यामागे दिसून येतो. शिक्षणसंस्था आणि उद्योगजगत यांच्यातील दुवा निर्माण करून विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील करिअरविषयी योग्य दिशा मिळावी, हा या प्रयत्नांचा व्यापक हेतू आहे.

सामाजिक सेवा आणि विद्या–र्थी विकासाचा सुंदर संगम त्यांच्या कार्यातून घडवण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

डॉ. अनिकेत देशमुख यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक सेवा आणि विद्यार्थी विकास यांची सांगड. रक्तदान शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते; आरोग्य तपासणी शिबिरातून समाज–सेवेची भावना वाढीस लागते; वक्तृत्व स्पर्धेतून विचार मांडण्याचे कौशल्य विकसित होते; तर लोकनृत्य स्पर्धेतून सांस्कृतिक जाणीव आणि कलागुणांना वाव मिळतो.

अशा विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण न देता जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य केले जात आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली राबविले जाणारे उपक्रम हे समाज आणि विद्यार्थी या दोन्ही घटकांच्या विकासाला समान महत्त्व देणारे आहेत.

डॉ. अनिकेत देशमुख यांच्या कार्यामध्ये सर्वांसाठी संधी आणि सर्वांचा विकास ही भावना प्रकर्षाने जाणवते. शहरातील विद्यार्थ्यांपासून खेडोपाड्यातील विद्यार्थ्यांपर्यंत, आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिकांपासून गरजू रुग्णांपर्यंत आणि विविध सामाजिक घटकांपर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

आरोग्यसेवा, रक्तदान, शिक्षण, रोजगार, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी घेतलेले उपक्रम यामुळे त्यांच्या कार्याला व्यापक सामाजिक परिमाण प्राप्त झाले आहे.

डॉ. अनिकेत देशमुख हे उत्कृष्ट संस्थात्मक संघटक, दूरदृष्टी अस–लेले नेतृत्व, शिक्षणप्रेमी, सेवाभावी समाजहितैषी आणि सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणून सांगोला परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण करीत आहेत.

६०० पेक्षा अधिक गरजू रुग्णांसाठी मोफत आरोग्य तपासणी, सांगोला व खेडोपाडी रक्तदान शिबिरांचे आयोजन, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी, वक्तृत्व व लोकनृत्य यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन आणि जिल्हा परिषद शाळेपासून जिल्ह्या–तील वरिष्ठ महाविद्यालयांपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना समान व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही त्यांच्या सर्वसमावेशक सामाजिक दृष्टिकोनाची ठोस उदाहरणे आहेत.

त्यांच्या कार्यातून एक गोष्ट स्पष्टपणे अधोरेखित होते–नेतृत्व म्हणजे केवळ पद भूषविणे नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन त्याच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे होय. या अर्थाने डॉ. अनिकेत देशमुख यांचे कार्य सांगोला परिसरातील सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे.

**– डॉ. शंकर बबीता संगाप्पा धसाडे**
**प्राचार्य**
**डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय**
**सांगोला**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पिके करपली, जमिनीला भेगा; दुष्काळग्रस्त गावांचा आमदार आवताडेंकडून पाहणी दौरा

## तातडीने पंचनामे करा, टँकर व चारा छावण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे दिले आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये पावसाने मोठी दडी मारल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पिके करपून गेली असून शेतजमिनींना मोठ्या भेगा पडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार समाधान आवताडे यांनी शुक्रवारी दुष्काळग्रस्त गावांचा पाहणी दौरा करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.





सकाळी वाजल्यापासून ९ वाजले पासून आमदार आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्यातील ममदाबाद हुन्नूर, लोणार, पडोळकरवाडी, रेवेवाडी, मानेवाडी, हुन्नूर, तसेच ओढ्यालगतच्या शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. यावेळी मका, बाजरी, कांदा, ऊस आणि तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे त्यांच्या निर्दर्शनास आले. अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे जळून गेली असून शेतजमिनींमध्ये भेगा पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

यावेळी शेतकऱ्यांनी आमदार आवताडे यांच्यासमोर पावसाअभावी निर्माण झालेल्या संकटाची व्यथा मांडली. पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, शेतकरी हा आपल्या मतदारसंघाचा कणा आहे. तो संकटात असताना त्याला वाऱ्यावर सोडणार नाही. या भागातील परिस्थितीचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी आणि कृषिमंत्र्यांना सादर करणार असून, तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल.तसेच पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करणे आणि जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्याची मागणी शासनाकडे करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या पाहणी दौऱ्यात उपस्थित महसूल विभागाचे अधिकारी, कृषी सहाय्यक आणि तलाठ्यांना आमदार आवताडे यांनी तातडीने पंचनामे सुरू करण्याच्या सूचना दिल्या. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

या पाहणी दौऱ्यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष, स्थानिक सरपंच, चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# गोगांव येथे प्रशासक संजय पाटील यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : ग्रामपंचायत गोगांव येथे प्रशासक संजय पाटील यांचे ग्रामपंचायत अधिकारी विक्रम घाटे यांनी सत्कार करून स्वागत केले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी श्री कलेश्वर महाराज येथे दर्शन घेऊन लोकांशी संवाद साधले मौजे गोगांव येथे प्रशासक अधिकारी पदभार घेतल्यावर गावात भेट देऊन विविध कामाचे, समस्यांचे चर्चा करण्यात आले यावेळी पाणी समस्यावर सविस्तर चर्चा करून उपायोजना करण्याबाबत ग्रामपंचायत अधिकारी यांना सूचना देण्यात आले.



# चेअरमन महेश इंगळे यांनी पदभार स्वीकारल्यापासून मंदिर व्यवस्थापनात आमूलाग्र बदल झाला : न्यायमूर्ती नीरज धोटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : न्यायमूर्ती नीरज धोटे यांचा सपत्निक सत्कार करताना प्रथमेश इंगळे दिसत आहेत.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश मालक इंगळे यांनी पदभार स्वीकारल्यापासून मंदिर व्यवस्थापनात आमूलाग्र बदल झाला असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालय, कोल्हापूर खंडपीठाचे माननीय न्यायमूर्ती नीरज धोटे साहेब यांनी व्यक्त केले.

आज श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे सहकुटूंब येऊन न्यायमूर्ती नीरज धोटे साहेब यांनी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश मालक इंगळे यांनी स्वामींचा प्रसाद, कृपावस्त्र आणि प्रतिमा देऊन न्यायमूर्ती नीरज धोटे साहेब यांचा सत्कार केला. यावेळी न्यायमूर्ती नीरज धोटे साहेब बोलत होते. पुढे बोलताना न्यायमूर्ती नीरज धोटे साहेब म्हणाले की श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेणे हा नेहमीच एक दिव्य अनुभव असतो. अक्कलकोट नगरीत पाऊल ठेवलं की मनातील सगळी चिंता दूर होते. स्वामींचा आशीर्वाद हाच आमच्या कार्याची खरी शक्ती आहे. भाविकांसाठी दर्शन रांग, स्वच्छता, भक्त निवास, महाप्रसाद आणि सुरक्षेच्या दृष्टीने जी उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे, ती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. लाखो भाविक दररोज येत असतानाही कुठेही गोंधळ नाही, हे नियोजनबद्ध व्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण आहे. महेश मालक आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन. स्वामींची सेवा अशीच अविरत घडो, हीच स्वामी चरणी प्रार्थना असल्याचे मनोगत ही व्यक्त केले.

यावेळी अक्कलकोट न्यायालयाचे न्यायमुर्ती शेख मॅडम, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, स्वप्निल मोरे आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

# अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत प्रबुद्धपाल बनसोडे व महेश गायकवाड यांना सुवर्णपदक

### राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी दोघांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, सोलापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत प्रबुद्धपाल दादासाहेब बनसोडे आणि महेश मल्हारी गायकवाड यांनी उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले.

ही स्पर्धा १ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तीनही राऊंडमध्ये आक्रमक व दमदार खेळ करत त्यांनी विजय मिळविला.










या स्पर्धेसाठी क्रीडा शिक्षक पठाण आणि गवळी यांचे मार्गदर्शन लाभले. अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा २०२६-२७ मध्ये सुवर्णपदक मिळविल्यामुळे प्रबुद्धपाल बनसोडे आणि महेश गायकवाड यांची राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे, नळदुर्ग शहर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुहास येडगे, नळदुर्ग नगर परिषदेचे पाणीपुरवठा सभापती तथा पत्रकार तानाजी जाधव, डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्य प्रवर्तक तथा नळदुर्ग नगर परिषदेचे गटनेते मारुती खारवे, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक दत्तात्रय दासकर माजी नगरसेवक सुधीर भैया हजारे, सोसायटीचे संचालक रघुनाथ आप्पा नागणे, सामाजिक कार्यकर्ते संजय जाधव, भाजपचे माजी शहराध्यक्ष पद्माकर घोडके आणि पत्रकार आयूब शेख यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीत अडथळे नकोत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघासह राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नवीन निर्णयानुसार मदत व सवलतींचा लाभ मिळताना येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करावेत अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे पंचनामे सरसकट करावेत. पाण्याअभावी पेरणी न केलेल्या शेतकऱ्यांना केवळ पीक नसल्याने मदतीपासून वंचित ठेवू नये. ई-पिक पाहणीची सक्ती करू नये, तसेच ऊस व फळबागांच्या नुकसानीचेही पंचनामे करावेत, अशी मागणी त्यांनी केली.

वाड्या-वस्त्यांवरील लोडशेडिंगचा प्रश्न सोडवून शेतीसाठी सलग आठ तास वीज द्यावी. प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र दुष्काळ निवारण केंद्र सुरू करावे. दुष्काळ अनुदान दिवाळीपूर्वी वाटप करून रोजगार हमीची कामे सुरू करावीत. टँकर पुरवठा वेळेत करून वाड्या-वस्त्यांसाठी लहान-मोठे टँकर उपलब्ध करावेत, जनावरांना चाऱ्यासाठी चारा डेपो किंवा चारा छावण्या लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### आमदार समाधान आवताडेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र; ई-पिक पाहणीची सक्ती हटविण्याची मागणी

मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागाला म्हैसाळ योजनेतून पुरेसे पाणी द्यावे. पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना नीरा-भाटघरचे पाणी उपलब्ध करून देण्यासह उजनीतून पंढरपूर व मंगळवेढ्यासाठी एक रोटेशन सोडावे, अशी मागणीही आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

सदर मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

### ज्ञानयात्री डॉ. रोंगे सरांनी साधला शिक्षकांबरोबर संवाद

# स्वेरीच्या डॉ.बी.पी. रोंगे सरांना कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षकांचा प्रचंड प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमामुळे राज्यात 'ज्ञानयात्री' म्हणून ओळख झालेले स्वेरीचे डॉ. बी. पी. रोंगे सर यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधला आणि त्यातून त्यांना प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. साधारण वर्षभरापासून डॉ. बी.पी.रोंगे सरांनी पुणे विभागात असणार्या पाचही जिल्ह्यांतील शाळा महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देवून समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याप्रमाणे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होत आहे त्याचप्रमाणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे भविष्यही उज्वल झाले पाहिजे. डॉ. रोंगे सरांच्या रूपाने पुणे विभागाला अभ्यासू आमदार मिळणार असल्याची भावना निर्माण झाली असून डॉ.रोंगे सरांच्या रूपाने शिक्षकांना मात्र खमक्या नेतृत्व मिळणार आहे, हे मात्र नक्की!

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. डॉ. रोंगे सर हे गेल्या वर्षापासून पुणे विभाग मतदार संघातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शाळा व कॉलेज मधील पदाधिकारी व शिक्षकांना भेटी देऊन त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. सर्वत्र डॉ. रोंगे सरांचे भव्य स्वागत केले जात आहे. या अनुषंगाने प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र कमालीची आघाडी घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे, हे मात्र वाढत्या प्रतिसादावरून समजते. एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. या भेटीमध्ये सर्व शाळांमध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी डॉ. रोंगे सरांचे कमालीचे स्वागत करत आहेत. मागील उमेदवारांनी फारसे काहीही केले नसल्याची भूमिका घेत आता डॉ. रोंगे सरांमुळे उत्साह वाढल्याचे दिसत आहे. एकूणच डॉ. रोंगे सर यांच्या स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील जवळपास शाळा महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी यावेळी खेडूत शिक्षण मंडळ कालकुंद्री संस्थेचे र. भा. माधोळकर महाविद्यालय चंदगड, न्यू इंग्लिश स्कूल चंदगड, धनंजय विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज नागणवाडी, संजय गांधी विद्यालय नागणवाडी, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कोवाड, श्री.शिवशक्ती हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज अडकूर, महाराष्ट्र एज्युकेशन न्ड स्पोर्ट अक्ॅडमी महादेव राव वांद्रे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी तुर्केवाडी, साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटी चंदगड यासह यासह इतर शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील समस्या जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य करणाऱ्या डॉ रोंगे सरांनी आपल्या अभ्यासाने आणि नियोजनात्मक धोरणामुळे प्रत्येक घटकाला यश मिळत आहे. या निवडणुकीच्या कारणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या भेटींचे सर्वत्र स्वागत होत आहे. या भेटी दरम्यान बोलताना डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की 'आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी, समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते. परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही त्यांनी दिली. या कारणांमुळे सर्वत्र डॉ. रोंगे सरांना प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट होते. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी कांही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.



# जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून मंगळवेढा-सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी

## पिकांचे नुकसान, पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा घेतला आढावा; पंचनामे सरसकट व अचूक करण्याचे निर्देश

## नुकसानीचे अनुदान थेट बँक खात्यात द्यावे; चारा डेपो व चारा छावण्यांऐवजी थेट अनुदान देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, कोरड्या पडलेल्या विहिरी तसेच जनावरांसाठी उपलब्ध चाऱ्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व मागण्या जाणून घेतल्या. तसेच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सरसकट पंचनामे करून नुकसानीची वस्तुनिष्ठ व अचूक नोंद घेण्याच्या सूचना दिल्या.







मंगळवेढा तालुक्यातील गणेशवाडी, आंधळगाव, लेंडवे चिंचोळी आणि शिरसी या गावांना जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. तसेच कोरड्या पडलेल्या विहिरी, पाण्याची उपलब्धता आणि जनावरांसाठी उपलब्ध चाऱ्याची माहिती घेतली. शेतकऱ्यांशी संवाद साधताना पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि चाऱ्याची उपलब्धता याबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली.

लेंडवे चिंचोळी येथे टँकरद्वारे सुरू असलेल्या पाणीपुरवठ्याची जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. टँकरमधून नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे किंवा नाही, याची माहिती घेतली. तसेच पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या टँकरला जीपीएस यंत्रणा बसविण्यात आली आहे किंवा नाही, याचीही त्यांनी प्रत्यक्ष तपासणी केली. पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये नागरिकांना नियोजित वेळेनुसार व आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या.

यानंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगोला तालुक्यातील वाकी(घेरडी), बुरलेवाडी, वाडेगाव, वाणीचिंचोळी आणि राजापूर या गावांना भेटी देऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता, विहिरींची पाणीपातळी, जनावरांसाठी उपलब्ध चारा तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

उपविभागीय अधिकारी अमित माळी यांनी मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. तसेच दोन्ही तालुका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती देऊन पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सरसकट करण्यात येत असल्याचे सांगितले. निर्धारित कालावधीत पंचनाम्यांचे अहवाल जिल्हा प्रशासनास सादर करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी मंगळवेढा तहसीलदार मदन जाधव, सांगोला तहसीलदार बाळूबाई भागवत, मंगळवेढा तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, सांगोला तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, संबंधित मंडल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक तसेच संबंधित गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शेतकऱ्यांशी संवाद व त्यांच्या मागण्या**

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दोन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व मागण्या जाणून घेतल्या. यावेळी नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून शासनाकडून मदत मिळण्यासाठी प्रशासनामार्फत वेळेत प्रस्ताव सादर करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीपोटी मिळणारे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी केली. तसेच पिण्याच्या पाण्याचे नियोजन व जनावरांसाठी पाणी व चाऱ्याचे नियोजन करावे. चाऱ्याची कमतरता निर्माण झाल्यास चाऱ्यासाठीचे अनुदानही थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात उपलब्ध करून द्यावे. चारा डेपो किंवा चारा छावण्या सुरू करण्याऐवजी थेट आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

---

# ३० वर्षांचा पाणीप्रश्न, आमदार अभिजीत (आबा) पाटील यांच्या पाठपुराव्याने अवघ्या ८ दिवसांत मार्गी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोडनिंब : जाधववाडी-मोडनिंब येथील गावठाण तलाव भरून संपूर्ण गावाला पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी ग्रामस्थ गेल्या ३० वर्षांपासून संघर्ष करत होते. अनेक वर्षांचा हा प्रलंबित प्रश्न अखेर आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या पुढाकारातून मार्गी लागला आहे.

काही दिवसांपूर्वी ग्रामस्थांनी आमदार अभिजीत आबा पाटील यांच्याकडे पाईपलाईनची मागणी केली. ग्रामस्थांची मागणी ऐकून घेत आमदारांनी तातडीने पाठपुरावा केला आणि अवघ्या आठ दिवसांत पाईपलाईन जाधववाडीपर्यंत पोहोचवून दिली.

या पाईपलाईनमुळे गावठाण तलावात पाणी आणणे शक्य होणार असून, जाधववाडी तसेच परिसरातील आजूबाजूच्या गावांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे गेल्या तीन दशकांपासून पाण्यासाठी सुरू असलेल्या संघर्षाला आता प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून दिशा मिळाली आहे.

ग्रामस्थांची मागणी, आमदारांचा तातडीचा पाठपुरावा आणि अवघ्या आठ दिवसांत प्रत्यक्ष पाईपलाईन - हा विकासकामातील गतिमान कार्यपद्धतीचा प्रत्यय आहे.

या पाईपलाईनचे आज ज्येष्ठ नेते भारत आबा शिंदे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

यावेळी बाबुतात्या सुर्वे, पंचायत समिती सदस्य बालाजी पाटील, कुरण गिड्डे, शिवाजी सुर्वे, नितीन गडधरे, संतोष दळवी,प्रवीण माने, विठ्ठल मोरे, सौदागर जाधव, राजकुमार जाधव, अभिजीत जाधव,उदय जाधव, संतोष मुटकुळे, संभाजी काळे, अख्तर तांबोळी, निलेश काळे, महादेव मोरे, अरुण सोमासे, नंदकुमार लादे, बाळासाहेब सोमासे, गंगाधर जाधव, माने महाराज, अंकुश जाधव, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

जाधववाडीच्या पाणीप्रश्नासाठी तातडीने पुढाकार घेतल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार अभिजीत आबा पाटील यांचे आभार मानले.

---

# पेठला स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती; शुभारंभाने शेतकऱ्यांच्या वर्षानुवर्षांच्या मागणीला मिळाले मूर्त स्वरूप

**मुख्यमंत्री बाजार समिती योजनेअंतर्गत बाजार समितीचा शुभारंभ; नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे यांची प्रमुख उपस्थिती**



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पेठ तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरलेल्या स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती, पेठचा शुभारंभ बुधवारी (दि. ३० सप्टेंबर) करण्यात आला. मा. मुख्यमंत्री बाजार समिती योजना अंतर्गत शासननिर्मित या स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शुभारंभ सोहळ्याला अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा पेठचे आमदार नरहरी झिरवाळ आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्कर भगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पेठ येथील जुनी आदिवासी सेवा सहकारी संस्था मर्या., रानदेवी मंदिराजवळ हा शुभारंभ सोहळा पार पडला. स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समितीची मागणी पूर्ण झाल्याने पेठ तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

पेठ तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतमालाच्या विक्रीसाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले असून स्वतंत्र पेठ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीला शासनाने मंजुरी दिल्याने शेतकऱ्यांची दीर्घकाळची मागणी पूर्ण झाली, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

शुभारंभ सोहळ्यात कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक वैभव मोरडे आणि प्रशासकीय सचिव विजयशिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

या कार्यक्रमाला पेठ तालुक्यासह पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. स्वतंत्र बाजार समितीमुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतमालाच्या विक्रीसाठी अधिक सुलभ आणि स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी तहसीलदार शिवाजी गवळी, प्रांताधिकारी आप्पासाहेब शिंदे, नगराध्यक्ष करण करवंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य भास्कर गावित, एनडीसीसी बँकेचे संचालक नामदेव हलकंदर, माजी सभापती शाम गावित, नंदू गवळी, विलास अलबाड, तालुका प्रमुख पद्माकर कामडी, नगरसेवक मनोज घोंगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पेठ तालुका हा शेतीप्रधान आणि आदिवासीबहुल भाग असल्याने येथील शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर शेतमालाची विक्री करण्यासाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध होणे महत्त्वाचे मानले जात आहे. बाजार समितीच्या माध्यमातून आगामी काळात शेतकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या सुविधा आणि बाजारपेठेतील व्यवहार याकडे आता तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

---

**नगरपंचायत निवडणूक चार महिन्यांवर; सत्ताधारी-विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी**

# मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावरून निफाडमध्ये राजकीय रणकंदन...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहर व परिसरातील मोकाट कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे या विरोधकांच्या प्रश्नावरूननिफाडनगरपंचायतीतील सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलेच राजकीय रणकंदन सुरू झाले आहे. मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावरून निवेदने, आंदोलने आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असतानाच सत्ताधारी गटाने पत्रकार परिषद घेऊन विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांमध्ये तथ्य नसल्याचा दावा केला आहे.नगरपंचायतीची पंचवार्षिक निवडणूक अवघ्या चार महिन्यांवर आल्याने मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नाचा राजकीय फायदा घेऊन नगरपंचायतीला बदनाम करण्याचे जाणीवपूर्वक षड्यंत्र रचले जात असल्याचा गंभीर आरोप उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे यांनी केला.



निफाड नगरपंचायतीमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे यांनी मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर नगरपंचायतीने केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. यावेळी नगराध्यक्ष अलका निकम, देवदत्त कापसे, नंदकुमार कापसे, माजी नगराध्यक्ष अरुंधती पवार, साहेबराव बर्डे आदी उपस्थित होते.उपनगराध्यक्ष कुंदे यांनी सांगितले की, मोकाट कुत्रे पकडण्यासाठी नगरपंचायतीने निविदा काढली होती. त्यानुसार २४ ऑक्टोबर २०२५ ते २४ जून २०२६ या कालावधीत संबंधित ठेकेदाराने शहरातील ७३ कुत्रे पकडले. नियमानुसार पकडलेल्या कुत्र्यांवर आवश्यक प्रक्रिया करून त्याच परिसरात पुन्हा सोडणे अपेक्षित होते. मात्र, संबंधित ठेकेदाराने नगरपंचायतीकडे जादा देयकाची मागणी केली. नगरपंचायतीने जादा देयक देण्यास नकार देत नियमानुसार प्रति कुत्रा १ हजार ६५० रुपये याप्रमाणे ७३ कुत्र्यांचे देयक अदा केले. त्यानंतर संबंधित ठेकेदाराने काम सोडल्याचे कुंदे यांनी स्पष्ट केले.त्यानंतर मोकाट कुत्र्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी १३ ऑगस्ट आणि २१ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा निविदा काढण्यात आल्या. मात्र, या निविदांना कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे नगरपंचायतीकडून सांगण्यात आले. नगरपंचायतीने केलेल्या पाहणीनुसार सध्या शहरात ८६ मोकाट कुत्रे असल्याचा दावाही यावेळी करण्यात आला विरोधकांकडून सातत्याने चुकीची भूमिका घेतली जात असल्याने नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांना त्रास सहन करावा लागत असून, त्यामुळे अधिकारी निफाड नगरपंचायतीत येण्यास तयार नसल्याचा आरोपही कुंदे यांनी केला. सध्या पाणीपुरवठा विभागातील अभियंत्याचे पद रिक्त असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

शहराच्या विकासासाठी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विकासाची स्पर्धा असली पाहिजे. मात्र, मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नाचा आधार घेऊन निफाडची बदनामी करू नये, असे आवाहन कुंदे यांनी केले.आपणही काही वर्षे विरोधी पक्षात काम केले असल्याचे सांगत उपनगराध्यक्ष अनिल कुंदे यांनी विरोधकांना खुले आव्हान दिले. कोणी कोणाच्या काळात किती विकासकामे केली, हे एका व्यासपीठावर येऊन सांगावे. मीदेखील माझ्या काळातील कामांचा लेखाजोखा मांडण्यास तयार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर नगरपंचायतीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येणार असून, कुत्रे पकडण्याबरोबरच त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देण्याच्या प्रक्रियेसाठी नव्याने निविदा काढण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. दरम्यान, शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित असलेल्या मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुरू असलेला संघर्ष आगामी नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणखी तीव्र होऊ नये हि निफाड नागरिकांची अपेक्षा आहे

---

# सेवा संकल्प अभियानातून वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण

**मोफत सूर्य घर १७२, नवीन वीज जोडणी १३५ तर स्मार्ट सोलर योजनेसाठी १० अर्ज प्राप्त**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सेवा संकल्प अभियानांतर्गत महावितरणकडून पंढरपूर महावितरणच्या वतीने तहसील कार्यालय, पंढरपूर येथे जनजागृती माहिती स्टॉल उभारण्यात आला आहे. या ठिकाणी नागरिकांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली जात आहे .तसेच वीज ग्राहकांच्या विविध तक्रारींचे निवारण केले जात आहे सोबतच वीज ग्राहकांचे अर्ज स्वीकारले जात असून, यामुळे ग्राहकांचा वेळ आणि श्रम वाचत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना प्रधानमंत्री सूर्यग्रह मोफत वीज योजनांचे नोंदणीकरण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच महावितरण संबंधित वीज जोडणी, वीज मीटर तसेच इतर वीज विषयक समस्यांचे निराकरण महावितरणच्या समन्वय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे. या स्टॉलच्या माध्यमातून नागरिकांना वीज बचत ,सौर ऊर्जा वापर, प्रधानमंत्री सूर्यग्रह मोफत वीज योजना, विद्युत सुरक्षा तसेच महावितरणच्या सेवांबाबत माहिती व मार्गदर्शन देण्यात येत आहे. पंढरपूर तालुक्यातून अभियानांतर्गत दि. १७ सप्टेंबरपासून प्रधानमंत्री मोफत सूर्य घर योजनेसाठी १७२, नवीन वीज जोडणी १३५, स्मार्ट सोलर योजनेसाठी १० अर्ज प्राप्त झाले आहेत.

सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या नागरी सुविधा अधिक सुलभ व पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. वीज जोडणी, वीज दुरुस्ती,स्मार्ट योजना, छतावर वीज निर्मिती करणे आदी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती ग्राहकांना दिली जात आहे तसेच इच्छुक ग्राहकांचे अर्जही यावेळी स्वीकारले जात आहेत.